आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२० एप्रिल २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वपक्षीय नेत्यांच्या देशभरात प्रचारसभा
- शिवसेनेकडून औरंगाबादमधून संदीपान भुमरे यांना लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर
- हिमाचल प्रदेशातल्या राज्यसभा निवडणुकीप्रकरणी भाजपा उमेदवार हर्ष महाजन यांना उच्च न्यायालयाची नोटीस
- विनेश फोगट आणि अंशू मलिक पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्लीविरुद्धच्या सामन्यात हैदराबादची दमदार धावसंख्येकडे वाटचाल

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी देशभरात विविध पक्षांच्या नेत्यांच्या सभा जोरात सुरू आहेत. प्रधानमंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी आज नांदेड, परभणीसह कर्नाटकात बेंगळुरू आणि चिकबल्लापूर इथं सभा घेतली. गेल्या १० वर्षातलं सरकारचं काम लोकांसमोर मांडण्यासाठी आणि त्यांचे आशिर्वाद घेण्यासाठी आल्याचं ते यावेळी म्हणाले. २०४७ पर्यंत विकसित भारत करण्यासाठी आठवड्याचे सातही दिवस २४ तास काम करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. माजी प्रधानमंत्री देवेगौडा यांनी यावेळी काँग्रेस सरकारवर टीका केली. उत्तर

प्रदेशातले मतदार सर्व ८० जागांवर भाजपाला जिंकून देतील, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांनी मथुरेत व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या सूर्य घर मोफत वीज योजनेमुळं गरीबांवर सोलर पॅनेल विकत घेण्याचा भार पडल्याचा आरोप कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी केला. प्रियंका गांधी यांनी केरळातल्या एरियाडमध्ये सभा घेतली. कायद्याचं रक्षण करण्यासाठी स्थापन केलेल्या सरकारी यंत्रणांचा वापर बेकायदेशीर गोष्टींसाठी होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सत्तेत आल्यानंतर इंडिया आघाडीचं सरकार शेतकऱ्यांचं कर्ज माफत करेल. मनरेगा आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांचं वेतन दुप्पट करेल, असं कॉंग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्जांची छाननी आज होत आहे. अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली.

**लातूर** लोकसभा मतदारसंघात ३६ व्यक्तींनी दाखल केलेल्या ५० अर्जांपैकी छाननीत ५ अवैध ठरली असून ३१ व्यक्तींचे अर्ज वैध ठरले आहेत.

**कोल्हापूर** लोकसभा मतदारसंघासाठी २७ उमेदवारांचे ३९ अर्ज वैध ठरले तर २ उमेदवारांचे ३ अर्ज अवैध ठरले आहेत. या छाननीमध्ये कॉंग्रेसच्या मालोजीराजे शाहू छत्रपती यांचा एक आणि बहुजन समाज पार्टीच्या संदीप नामदेव शिंदे यांचे २ अर्ज अवैध ठरले.

**हातकणंगले** लोकसभा मतदारसंघात 32 उमेदवारांचे 50 अर्ज वैध आणि ४ उमेदवारांचे 5 अर्ज अवैध ठरले. कामगार किसान पार्टीचे संतोष खोत यांच्यासह जगन्नाथ मोरे, बाळकृष्ण म्हेत्रे, विश्वास कांबळे आणि अस्मिता देशमुख या अपक्षांचे अर्ज अवैध ठरले.

**सातारा** लोकसभेसाठी एकूण २४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. आज केलेल्या छाननीमध्ये २१ उमेदवारांचे अर्ज वैध तर ३ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

**रायगड** लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण २८ उमेदवारांनी ४० अर्ज दाखल केले होते. आज पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत २१ उमेदवारांची २७ अर्ज वैध ठरले असून ७ उमेदवारांचे १३ अर्ज अवैध ठरल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** लोकसभा मतदारसंघात सादर झालेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीत सर्व उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. या मतदारसंघात एकूण नऊ उमेदवारांनी १३ अर्ज दाखल केले आहेत.

तिसऱ्या टप्प्यात होत असलेल्या निवडणुकांसाठी येत्या सोमवारी दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. या टप्प्यात राज्यातल्या लोकसभेच्या ११ जागांसह देशातल्या एकूण ९४ जागांसाठी येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेनं राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांना उमेदवारी दिली आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्यानंतर लोकसभेच्या रिंगणात उतरलेले ते राज्यातले दुसरे मंत्री आहेत. त्यांच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी खासदार चंद्रकांत खैरे रिंगणात आहेत. गेल्यावेळी MIM च्या इम्तियाज जलील यांनी त्यांना पराभूत केलं होतं. जलील यावेळीही निवडणूक रिंगणात आहेत. वंचित बहुजन आघाडीनं औरंगाबादमधून अफसर खान यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण रायगड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महावीर जयंतीच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना आणि जैन समाजाला शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या शुभेच्छा संदेशात राष्ट्रपती म्हणाल्या, अहिंसा आणि करुणेचे मूर्तिमंत भगवान महावीर यांचा जन्माेत्सव म्हणून होणारा हा सण प्रेम आणि शांतीचा संदेश देतो. महावीर जयंतीच्या शुभमुहूर्तावर आपण समाजात प्रेम आणि सदभाव कायम ठेवू आणि राष्ट्राच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहू, अशी शपथ घेऊ या.

**<><><><><><>**

नवीन फौजदारी न्याय कायदे समाजासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे. भारत आपल्या फौजदारी न्याय व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदलांसाठी तयार आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केले. दिल्लीत याविषयावरच्या परिषदेत आज त्यांनी मार्गदर्शन केलं. नवीन कायद्यांनी भारताच्या कायदेशीर चौकटीला फौजदारी न्यायाच्या संदर्भात नवीन युगात बदलले आहे. नागरिक म्हणून आपण ते स्वीकारले तरच नवीन कायदे यशस्वी होतील, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

सक्तवसुली संचालनालयाने गुरुवारी मुंबई, चेन्नई, कोलकाता आणि दिल्ली इथं विविध ठिकाणी शोधमोहीम राबवली. ऑक्टा एफएक्स ट्रेडिंग ॲप आणि वेबसाइट या आंतरराष्ट्रीय ब्रोकर्सद्वारे बेकायदा ऑनलाइन फॉरेक्स ट्रेडिंगप्रकरणी सुरू असलेल्या चौकशीचा भाग म्हणून इडीनं ही शोधमोहीम राबवली. या शोधमोहिमेदरम्यान, बँकेतली २ कोटी ७० लाख रुपये इतकी रक्कम गोठवण्यात आली आहे आणि विविध कागदपत्रे, डिजीटल उपकरणं जप्त करण्यात आली असल्याची माहिती ईडीनं आज एका निवेदनात दिली आहे . उच्च परताव्याची खोटी आमिषं दाखवून फॉरेक्स ट्रेडिंगच्या नावाखाली लोकांची फसवणूक केल्याबद्दल पुण्यातल्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यानं अनेक लोकांविरुद्ध नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे इडीनं तपास सुरू केला आहे.

<><><><><><>

हिमाचल प्रदेशमध्ये फेब्रुवारी महिन्यात झालेल्या राज्यसभा निवडणुकीच्या निकालाविरोधात काँग्रेस उमेदवार अभिषेक मनु सिंघवी यांनी केलेल्या आव्हान याचिकेवर आज हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयात सुनावणी झाली. निवडणुकीतले भाजपचे विजयी उमेदवार हर्ष महाजन यांना न्यायालयाने नोटीस बजावली आहे. पुढील सुनावणी २३ मे रोजी होणार आहे.

या निवडणुकीत सिंघवी आणि महाजन या दोन्ही उमेदवारांना समान मतं पडल्यानं चिठ्ठी काढण्यात आली. चिठ्ठीत सिंघवी यांचं नाव आल्यावर त्यांना पराभूत ठरवण्यात आलं. चिठ्ठीत नाव आल्यावर त्या उमेदवाराला विजयी ठरवायला हवं, असा दावा करत सिंघवी यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

<><><><><><>

ओदिशात झारसुगुडा जिल्ह्यात महानदी इथं बोट उलटून झालेल्या अपघातातल्या मृतांची संख्या ७ झाली आहे. सर्व सातही मृतदेहांची ओळख पटली आहे. बचाव पथक एका बेपत्ता महिलेचा शोध घेत आहे. काल झारसुगुडा जिल्ह्यात लाखनपूर जवळ ५४ प्रवाशांना घेऊन प्रवास करणारी ही बोट महानदीत उलटून हा अपघात झाला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी ओदिशात झारसुगुडा जिल्ह्यात महानदी इथं बोट उलटून झालेल्या अपघातातल्या मृत्यूंबाबत शोक व्यक्त केला आहे.

दरम्यान, अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना जिल्हा प्रशासनानं चार लाख रुपयांचं अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

**<><><><><><>**

फेब्रुवारी महिन्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेसोबत १५ लाख ४८ हजार सदस्य जोडले गेल्याची माहिती संघटनेनं दिली आहे. आज प्रकाशित झालेल्या अहवालानुसार या महिन्यात तब्बल ७ लाख ७८ हजार नवे सदस्य जोडले गेले. यांपैकी दोन लाखापेक्षा जास्त महिला सदस्य आहेत.

फेब्रुवारी महिन्यात जोडले गेलेल्या सदस्यांपैकी ५६ टक्क्यापेक्षा जास्त सदस्य हे १८ ते २५ वयोगटातले आहेत. याशिवाय ११ लाख ७८ हजार सदस्य हे संघटना सोडून पुन्हा एकदा नव्याने जोडले गेले असल्याचेही संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

भारताच्या विनेश फोगट आणि अंशू मलिक आज पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरल्या. किर्गिस्तानातल्या बिश्केक इथं आशियाई ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत

त्यांनी ही पात्रता मिळवली. फोगटने ५० किलो वजनी गटात कझाकस्तानच्या लॉरा गानिकिझीचा, तर अंशूने ५७ किलो गटात उझबेकिस्तानच्या लायलोखॉन सोबिरोवाचा पराभव केला. तर मानसी अहलावत हिला मात्र, उत्तर कोरियाच्या ह्योन जी मुनकडून पराभव पत्करावा लागला.

९ मे पासून तुर्कस्तानमध्ये होणाऱ्या आगामी जागतिक पात्रता फेरीत कुस्तीपटूंना पॅरिस ऑलिम्पिकसाठी कोटा सुरक्षित करण्याची शेवटची संधी आहे.

**<><><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबादनं मोठी धावसंख्या उभारण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा हैदराबादच्या ९ व्या षटकात २ बाद १५१ धावा झाल्या होत्या.

सलामीवीर अभिषेक शर्मा १२ चेंडूत ६ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीनं ४६ धावांवर बाद झाला.

दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपीटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><><>//**